नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २७६ Issue - 276 | वार बुधवार दि. २५ फेब्रुवारी २०२६ Blow- Wednesday Date 25 February 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## विधानसभेत ११,९९५ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर



### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून पुरवणी मागण्या सादर; राज्य सरकारच्या निर्णयावर काँग्रेस आक्रमक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्राच्या विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारी म्हणजेच कालपासून सुरु झालं आहे. आज राज्य सरकारच्यावतीनं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत ११,९९५ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. तर, राज्य सरकारच्या या निर्णयावर काँग्रेस नेते सचिन सावंत यांनी टीका केली आहे. सचिन सावंत यांनी अर्थसंकल्पीय, पावसाळी, हिवाळी अशी विधिमंडळाच्या अधिवेशनांन नावे देण्याऐवजी पुरवणी अधिवेशन असे एकच नाव द्यावे, असा सल्ला देखील महायुती सरकारला दिला आहे.

देवेंद्र फडणवीस यांच्याकडून पुरवणी मागण्या सादर

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत पुरवणी मागण्या सादर केल्या. महसुली खात्यावरील एकूण खर्च - ५,७४८ कोटी रुपये तर भांडवली खात्यावरील खर्च ६००३ कोटी रुपये आहे. या पुरवणी मागण्यांमधील प्रमुख तरतुदी म्हणजे कोणत्या खात्यांसाठी आहेत याची सविस्तर माहिती खालील प्रमाणे आहे.

ऊर्जा आणि उद्योग क्षेत्र: ऊर्जा, कामगार, उद्योग आणि खनिकर्म विभागासाठी ४,०६६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यापैकी सर्वाधिक ३२६२ कोटी रुपये वीज क्षेत्रासाठी, तर ८०३ कोटी रुपये ग्राम आणि लघु उद्योगांसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत.

पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागासाठी १४३१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तर ग्राम विकास विभागासाठी ७१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

नियोजन विभाग: ८० कोटी रुपये, अन्न व नागरी पुरवठा विभाग: ५५.५२ कोटी रुपये., ओबीसी कल्याण विभाग: २३.६४ कोटी रुपये, महसूल आणि वन विभाग: १३२ कोटी रुपये, वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभाग: ३१ कोटी रुपये. राज्य सरकारकडून प्रत्येक अधिवेशनात पुरवणी मागण्या मांडल्या जात असल्यानं विरोधकांनी यावर आक्षेप घेतला आहे. काँग्रेस नेते सचिन सावंत यांनी पोस्ट करत राज्य सरकारला काही सवाल विचारले आहेत.

सचिन सावंत म्हणाले अर्थसंकल्पीय, पावसाळी, हिवाळी अशी विधिमंडळाच्या अधिवेशनांन नावे देण्याऐवजी पुरवणी अधिवेशन असे एकच नाव द्यावे. उगीचच अर्थसंकल्पीय अधिवेशन वगैरे शब्द वापरून जनतेची दिशाभूल का करावी?, असा सवाल सचिन सावंत यांनी केला.

अर्थसंकल्प या शब्दातून महायुती सरकारच्या काळात प्रत्येक अधिवेशनात जर पुरवणी मागण्या त्याही हजारो कोटींच्या येत असतील तर नियोजन ते काय? आणि अर्थसंकल्पीय अधिवेशनात ही त्या आणल्या जात असतील तर या संकल्पाला अर्थ काय? हा प्रश्न विचारला पाहिजे, असं सचिन सावंत यांनी म्हटलं.

## अजितदादांच्या विमान अपघातानंतर व्हीएसआर व्हेंचअर्सला मोठा दणका, चार लिअरजेट विमानांच्या उड्डाणाला मनाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर एक मोठी बातमी समोर आली आहे. तडठ व्हेंचअर्सला मोठा दणका बसला आहे. नागरी विमान वाहतूक महासंचालनालय कडून चार लिअरजेट ४५ विमानांच्या उड्डाणांना बंदी घालण्यात आली आहे. अजित पवार यांच्या अपघातानंतर या विमानांचं विशेष ऑडिट करण्यात आलं होतं. त्यामध्ये उणीवा आढळल्यामुळं या सर्व विमानांचं उड्डाण रद्द करण्याचा निर्णय डीजीआय कडून घेण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, लिअरजेट ४०/४५ या मॉडेलच्या चार विमानांना उड्डाण करण्यास मनाई करण्यात आली आहे. या विमानांमध्ये उणीवा आढळल्यामुळं उड्डाण रद्द करण्याचा निर्णय ऊग्र्छ कडून घेण्यात आला आहे. यापूर्वी रोहित पवार.यांनी लिअरजेट विमानाच्या संदर्भात शंका उपस्थित केल्या होत्या. या विमानांचे उत्पादन अमेरिकेत होते.




ही विमाने अमेरिकेत अनेक वर्ष वापरली गेली होती. त्यानंतर ती भारतात आणली होती असे रोहित पवारा यांनी सांगितले होते. याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले होते. अहवालानुसार, विमानाच्या एअरवर्दीनेस म्हणजे उड्डाणासाठी आवश्यक असलेल्या अनेक मानकांचं आणि प्रक्रियांचं उल्लंघन झाल्याचा प्राथमिक निष्कर्ष या अहवालातून देण्यात आला आहे. विमान प्रवासादरम्यान आवश्यक असलेल्या विमान सुरक्षा नियमांचं पालन केलं नाही. निष्कर्षाच्या आधारे व्हीएसआर कंपनीची चार लेअर जेट विमानांच्या उड्डाणावर बंदी घालण्यात आली आहे.

## केंद्रीय मंत्रिमंडळाकडून महाराष्ट्रासह ८ जिल्ह्यांतील रेल्वे मार्गवाढीच्या तीन मल्टी-ट्रॅकिंग प्रकल्पांना मंजुरी

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहार समितीने रेल्वे मंत्रालयाच्या सुमारे ९,०७२ कोटी रुपयांच्या तीन महत्त्वाच्या रेल्वे मार्गवाढीच्या प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. या प्रकल्पांमध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रातील गोंदिया - जबलपूर मार्ग दुहेरीकरणाचा समावेश आहे.

महाराष्ट्र, मध्य प्रदेश, बिहार आणि झारखंड या चार राज्यांतील८ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पांमुळे भारतीय रेल्वेच्या विद्यमान जाळ्यात सुमारे ३०७ कि.मी.ची भर पडणार आहे. यामध्ये गोंदिया-जबलपूर दुहेरीकरणासोबतच पुनारख-किऊल आणि गम्हरिया-चांडिल या मार्गांच्या तिसऱ्या आणि चौथ्या लाईनच्या कामांचा समावेश आहे.




### गोंदिया -जबलपूर मार्ग दुहेरीकरणाला मंजुरी

या प्रस्तावित मल्टी-ट्रॅकिंग प्रकल्पामुळे सुमारे ५,४०७ गावे आणि जवळपास ९८ लाख लोकसंख्येचा रेल्वे संपर्क अधिक सुधारेल. रेल्वे मार्गांची वाढलेली क्षमता वाहतूक व्यवस्थेत लक्षणीय सुधारणा घडवून आणेल, ज्यामुळे भारतीय रेल्वेची कार्यक्षमता आणि सेवा विश्वसनीयता वाढेल. या निर्णयामुळे रेल्वे संचालन अधिक सुलभ होईल आणि प्रवासी तसेच मालवाहतुकीतील गर्दी कमी होण्यास मोठी मदत होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'नवीन भारत' दृष्टिकोनानुसार हे प्रकल्प प्रादेशिक सर्वांगीण विकास साधण्यावर भर देतात, ज्यातून स्थानिक स्तरावर रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी वाढून नागरिक आत्मनिर्भर बनतील.

(पान २ वर...)

### नैसर्गिक जीवनपद्धतीचा अवलंब केल्यास वैद्यकीय क्षेत्रावरील ताण कमी - राज्यपाल आचार्य देवव्रत

### राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांचे प्रतिपादन

## गरजूंपर्यंत गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा पोहचविणे हीच खरी देशसेवा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : देशातील गरीब व्यक्तींपर्यंत विनासायास व गुणवत्तापूर्ण वैद्यकीय सेवा पोहोचविणे हे आपले प्रमुख ध्येय असले पाहिजे. जागतिक दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासन सातत्याने कार्यरत असून या क्षेत्रातील नवोपक्रमांना संशोधनासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून प्रोत्साहन दिले जात आहे. प्रत्येक भारतीयाला गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा पोहचविणे हेच देशसेवेचे महत्त्वपूर्ण अंग असल्याचे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अधोरेखित केले.

लोक भवन येथील दरबार सभागृहात पी. डी हिंदुजा रुग्णालयाच्या 'जीवन वाचवणे आणि निरोगी भारत निर्माण करणे' या देशव्यापी मोहिमेच्या उद्घाटनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या मोहिमेचे उद्घाटन राष्ट्रपती श्रीमती मुर्मू यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या, देशात औषधनिर्मिती आणि आरोग्य सुविधांच्या क्षेत्रात मोठी प्रगती झाली आहे. सर्व देशवासी निरोगी राहावेत, यासाठी आयुष्मान भारत अंतर्गत एक लाखांहून अधिक आरोग्य मंदिर कार्यरत आहेत. तसेच मिशन इंद्रधनुष्य सारख्या उपक्रमांद्वारे लसीकरण मोहिमेला गती देण्यात आली आहे. देशात १२ कोटींहून अधिक कुटुंबांना आयुष्मान भारत कार्ड वितरित करण्यात आले असून यामुळे लाखो नागरिकांना उपचारांचा आधार मिळाला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही तातडीच्या वैद्यकीय सेवांना प्राधान्य देत रुग्णवाहिका सेवा व ट्रॉमा केअर सेंटरच्या सुविधा वाढविण्यावर भर दिला आहे. यासोबतच जनसामान्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे अत्यावश्यक आहे. योग्य वेळी उपचारांची माहिती व सुविधा उपलब्ध झाल्यास अनेकांचे प्राण वाचू शकतात,असेही त्यांनी नमूद केले. देशात अनेक महत्त्वपूर्ण औषधांचे उत्पादन होत असले तरी काही वैद्यकीय उपकरणे व औषधे आयात करावी लागतात. ती देशातच तयार व्हावीत यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहनही राष्ट्रपती मुर्मू यांनी केले.

कोविडनंतरच्या काळात मानसिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. एकाकीपणा, उदासीनता यांसारख्या समस्यांमुळे वैयक्तिक, कौटुंबिक व व्यावसायिक आयुष्यात अडचणी निर्माण होतात. त्यामुळे मानसिक आरोग्य सेवाही तितक्याच सक्षमपणे उपलब्ध व्हाव्यात, अशी अपेक्षा राष्ट्रपती मुर्मू यांनी यावेळी व्यक्त केली.

वैद्यकीय शिक्षणासाठी पदव्युत्तर पदवीच्या जागा वाढविण्यात आल्या आहेत. दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अनेक राज्यांमध्ये अखिल भारतीय आयुर्विज्ञान रुग्णालये सुरू करण्यात आली असून त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. हिंदुजा हॉस्पिटल समूह यांच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या जीव वाचविणे, निरोगी भारत निर्माण करणे (डर्रींळपस ङळींशी, ईीळश्रव- ळपस र क्शरश्रींहळशी इहरीरीं चर्ळीीळेप) या अभियानाचे त्यांनी कौतुक केले. वर्षभर चालणाऱ्या या उपक्रमांतर्गत दुर्गम व ग्रामीण भागात रुग्णसेवा पुरविण्यात येणार असून तात्काळ वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून जीव वाचविण्याचे पुण्यकर्म या अभियानाच्या माध्यमातून होत असल्याचे गौरवोद्गार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी यावेळी काढले.




नैसर्गिक जीवनपद्धतीचा अवलंब केल्यास वैद्यकीय क्षेत्रावरील ताण कमी - राज्यपाल आचार्य देवव्रत

नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्याचे धोरण सरकारने स्वीकारले असून, नैसर्गिक जीवनपद्धतीचा अवलंब केल्यास वैद्यकीय क्षेत्रावरील ताण कमी होऊ शकतो. मानव, निसर्ग आणि धरती वाचवण्यासाठी आजारांचे वाढते प्रमाण रोखण्याच्या दृष्टीने वैद्यकीय तज्ञांनी कार्य करण्याची गरज असल्याचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सांगितले.

कोविड-१९ काळात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने लसीचा शोध लावून 'सर्वे भवन्तु सुखिन:' या तत्वानुसार जगातील अनेक देशांना लस उपलब्ध करून दिली. गरीब व वंचित घटकांसाठी कार्य करणे हा भारतीय संस्कृतीचा महत्त्वाचा पैलू असून, त्याच भावनेतून आरोग्य क्षेत्रात सेवा कार्य अधिक व्यापक व्हावे, असे आवाहन राज्यपाल देवव्रत यांनी केले.

हिंदुजा रुग्णालय समूहाच्या वतीने गेल्या ७५ वर्षांत मानवतावादी दृष्टिकोनातून उत्कृष्ट वैद्यकीय सेवा देण्याचा प्रयत्न केला आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. देश-विदेशातील रुग्णांना दर्जेदार उपचार देऊन या संस्थेने भारताची प्रतिष्ठा आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचावली आहे, असे त्यांनी सांगितले.ग्रामीण व दुर्गम भागातील वंचित आणि गरजू रुग्णांना सेवा देण्याचे कार्य विशेष महत्त्वाचे ठरणार असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. कॅन्सर, हृदयविकार, किडनीशी संबंधित आजारांच्या मुळावर उपचार होणे अत्यावश्यक असून, दिनचर्या, आहार पद्धती यांचा आरोग्यावर होणारा परिणाम याबाबत वैद्यकीय तज्ज्ञांनी सखोल विचार करणे गरजेचे असल्याचे राज्यपाल आचार्य देवव्रत सांगितले.

राज्यात ५ किलोमीटरच्या अंतरावर आरोग्य सुविधा देण्यासाठी शासनाचे सातत्यपूर्ण प्रयत्न - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

राज्यात प्रत्येक नागरिकाला तो राहत असलेल्या ठिकाणापासून ५ किलोमीटरच्या अंतरावर सर्व प्रकारच्या आरोग्य सुविधा देण्यासाठी शासन सातत्यपूर्ण प्रयत्न करीत आहे. या आरोग्य सुविधा सुलभ व सहजरित्या उपलब्ध होण्यासाठी खासगी क्षेत्रातील आणि धर्मदाय संस्थांच्यावतीने चालवण्यात येणारी रुग्णालये यांनी योगदान द्यावे, अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्य शासन २ हजार ४०० पेक्षा जास्त विविध आजारांवर महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचारांचा लाभ देत आहे. राज्यात प्रभावी आरोग्य सुविधा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी हिंदुजासारखे रुग्णालय राज्य शासनाला निश्चितच मदत करतील. देशाच्या फाळणीनंतर निर्माण झालेल्या विपरीत परिस्थितीत हिंदुजा समूहाने रुग्णसेवा सुरू केली. आज हिंदुजा समूहाची रुग्णालये देशातील नामांकित रुग्णालयांपैकी आहेत. या रुग्णालयांमध्ये अनेक देशांमधून नागरिक उपचारासाठी येऊन बरे होऊन जातात.

हिंदुजा विश्वस्तांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर समाज परिवर्तनाचे कार्य होत आहे. पालघर जिल्ह्यातील कुपोषणमुक्तीसाठी या समूहाने केलेले कार्य कौतुकास्पद आहे. रुग्णालयाच्या प्रयत्नांमुळे निश्चितच या भागात कुपोषणावर मात करण्यास मदत होत आहे. 'जीव वाचवणे आणि निरोगी भारत निर्माण करणे' सुरू केलेली ही देशव्यापी मोहीम हिंदुजा रुग्णालयाच्या आरोग्य क्षेत्रातील कामाचे मूर्तीमंत उदाहरण असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

क्षयरोगाचे जिवाणू औषधांना दाद न देण्याचा प्रकार (ड्रग रेजिस्टन्स) सर्वप्रथम हिंदुजा रुग्णालयाने शोधला. हिंदुजा रुग्णालयाचे हेच संशोधन पुढे राष्ट्रीय स्तरावर क्षयरोगाच्या प्रभावी उपचारासाठी धोरणाचा भाग बनले. टाईप वन मधुमेहामध्ये हिंदुजा समूहाच्यावतीने बालकांवर उपचाराचे मोठे काम केले जात असल्याचे गौरवोद्गारही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी काढले.

हिंदुजा समूहाचे अध्यक्ष अशोक हिंदुजा यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी प्रास्ताविकात समूहाच्या माध्यमातून आरोग्य क्षेत्रात सुरू असलेले विविध कार्यही, संशोधन, उपचार पद्धती याविषयी माहिती दिली.

## संपादकीय....

### पुरवणी मागण्या

महाराष्ट्राच्या विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारी म्हणजेच कालपासून सुरु झालं आहे. आज राज्य सरकारच्यावतीनं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत ११,९९५ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. महसुली खात्यावरील एकूण खर्च - ५,७४८ कोटी रुपये तर भांडवली खात्यावरील खर्च ६००३ कोटी रुपये आहे. या पुरवणी मागण्यांमधील प्रमुख तरतुदी म्हणजे कोणत्या खात्यांसाठी आहेत याची सविस्तर माहिती खालील प्रमाणे आहे. ऊर्जा आणि उद्योग क्षेत्र: ऊर्जा, कामगार, उद्योग आणि खनिकर्म विभागासाठी ४,०६६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यापैकी सर्वाधिक ३२६२ कोटी रुपये वीज क्षेत्रासाठी, तर ८०३ कोटी रुपये ग्राम आणि लघु उद्योगांसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागासाठी १४३१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तर ग्राम विकास विभागासाठी ७१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. नियोजन विभाग: ८० कोटी रुपये, अन्न व नागरी पुरवठा विभाग: ५५.५२ कोटी रुपये., ओबीसी कल्याण विभाग: २३.६४ कोटी रुपये, महसूल आणि वन विभाग: १३२ कोटी रुपये, वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभाग: ३१ कोटी रुपये. राज्य सरकारकडून प्रत्येक अधिवेशनात पुरवणी मागण्या मांडल्या जात असल्यानं विरोधकांनी यावर आक्षेप घेतला आहे. काँग्रेस नेते सचिन सावंत यांनी पोस्ट करत राज्य सरकारला काही सवाल विचारले आहेत.

# लहान मुलांच्या कपड्यांच्या दालनाचा शुभारंभ उत्साहात

## रविवारी डॉ. शितल शहा कुटुंबीयांच्या हस्ते शुभारंभ संपन्न झाला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरातील प्रसिद्ध बालरोग तज्ञ प्रसिद्ध असणारे डॉक्टर शितल शहा यांनी लहान मुलाचे कपड्याची दालन उभे केले आहे.

या दानाचा शुभारंभ डॉक्टर शीतलच्या शहा यांच्या पत्नी सौ सुषमा शितल शहा यांच्या शुभहस्ते या दालनाचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी संदीप शितल शहा आणि सांत्वना संदीप शहा यांची प्रमुख उपस्थिती होती. या शुभारंभ सोहळ्यास आमदार समाधान आवताडे, अमर पाटील, प्रणव परिचारक, यांच्यासह तालुक्यातील अनेक प्रमुख नेत्यांनी उपस्थिती लावली होती. पंढरपूर शहरांमध्ये लहान मुलांची कपडे घेण्यास अनेक दुकाने बघावी लागतात. पंढरपूर शहरात डॉक्टर शितल शहा यांनी लहान मुलांच्या कपड्याची दालन उभारून या कपड्यांसाठी नागरिकांची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. पंढरपूर शहरातील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज समोरील श्री विठ्ठल रुक्मिणी व्यापारी संकुल येथे हे शोरूम साकारण्यात आले आहे. जन्मलेल्या मुलापासून ते वीस वर्षाच्या मुलापर्यंतचे सर्व कपडे येथे उपलब्ध करून देण्यात आले आहे. अशा प्रकारचे शोरूम हे पंढरपूरमध्ये प्रथमच उभारण्यात आले आहे. डॉक्टर शीतल सिंह यांनी एका वेगळ्या उद्योगात त्यांनी प्रवेश केल्याची दिसून येत आहे.



रविवारी दिनांक २२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी पाच वाजता या भव्यतांनाच्या शुभारंभ डॉक्टर शीतल शा व त्यांच्या दांपत्याच्या सुभाष ते करण्यात आला. यावेळी आमदार समाधान आवताडे, आमदार अभिजीत पाटील यांची बंधू अमर पाटील, प्रणव परिचारक, पंढरपूर शहरातील अनेक नामवंत मंडळींनी या धंदाच भेट दिली आहे.

**पंढरपूर शहरातील प्रसिद्ध बालरोग तज्ञ यांनी लहान मुलांसाठी फर्स्ट क्राय हे कपड्याचे दालन उभारले आहे. या दालनाचा शुभारंभ डॉक्टर शितल शहा व त्यांच्या सुविद्य पत्नी सुषमा शितल शहा यांनी उद्घाटन केले. यावेळी सुदीप शितल शहा, सांत्वना सुदीप शहा प्रमुख उपस्थितीत होते.**

४:३० ि, २४/२/२०२६ ठर-क्षशपवीर घेीज्ञश झरींळश्र: चौकट, पंढरपूर शहरातील प्रसिद्ध बालरोग तज्ञ यांनी लहान मुलांसाठी फर्स्ट क्राय हे कपड्याचे दालन उभारले आहे. या दालनाचा शुभारंभ डॉक्टर शितल शहा व त्यांच्या सुविद्य पत्नी सुषमा शितल शहा यांनी उद्घाटन केले. यावेळी सुदीप शितल शहा, सांत्वना सुदीप शहा प्रमुख उपस्थितीत होते.

## केंद्रीय मंत्रिमंडळाकडून महाराष्ट्रासह ८ जिल्ह्यांतील रेल्वे मार्गवाढीच्या तीन मल्टी-ट्रॅकिंग प्रकल्पांना मंजुरी

(पान १ वरून..) 'प्रधानमंत्री गति शक्ती' राष्ट्रीय मास्टर प्लॅन अंतर्गत तयार करण्यात आलेल्या या प्रकल्पांचा मुख्य उद्देश एकात्मिक नियोजन आणि विविध घटकांच्या सल्लामसलतीद्वारे बहुमार्गीय संपर्क मल्टीमॉडेल कनेक्टिव्हिटीर आणि वाहतूक कार्यक्षमता वाढवणे हा आहे. यामुळे लोक, वस्तू आणि सेवांची अखंडित वाहतूक सुनिश्चित होईल. या क्षमता वाढीमुळे देशातील अनेक महत्त्वाच्या पर्यटन स्थळांपर्यंत रेल्वे संपर्क सुधारेल, ज्यात जबलपूरचे कचनार शिव मंदिर, बालाघाटमधील कान्हा राष्ट्रीय उद्यान, पेंच राष्ट्रीय उद्यान, धुआंधार धबधबा आणि दलमा वन्यजीव अभयारण्य यांसारख्या प्रसिद्ध स्थळांचा समावेश आहे.

हे प्रकल्प कोळसा, पोलाद, लोखंड खनिज, सिमेंट, अन्नधान्य आणि खते यांसारख्या अत्यावश्यक वस्तूंच्या वाहतुकीसाठी महत्त्वाचे मार्ग उपलब्ध करून देतील. या रेल्वेमार्गांच्या विस्तारामुळे दरवर्षी ५२ दशलक्ष टन (चढ्झ) अतिरिक्त मालवाहतूक शक्य होईल.

## निफाडला तालुकास्तरीय शिबिरात ५१ शस्त्रक्रिया संदर्भित दिव्यांग विद्यार्थ्यांची तपासणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील शस्त्रक्रिया संदर्भित असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी निफाड उपजिल्हा रुग्णालयात तालुकास्तरीय शिबीर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरात ५१ विद्यार्थ्यांनी तपासणीचा लाभ घेतला. विद्यार्थ्यांना निफाड उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ राजीव तांबाळे व आर.बी.एस.के. टीम यांनी उपस्थित दिव्यांग विद्यार्थ्यांची केली.




यावेळी उपस्थित पालकांना पुढील तपासणी व शस्त्रक्रियेबाबत विस्तृत माहिती व मार्गदर्शन करण्यात आले.सदर शिबीर निफाडचे गटशिक्षणाधिकारी विलास साळी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले होते. याप्रसंगी विषयतज्ञ मुकेश जगताप, विशेष शिक्षिका शिला मोरे आदींचे सहकार्य लाभले.असे शिबिर सातत्याने होत रहावे यासाठी पालकांनी डॉक्टरांकडे मागणी केली असून ज्या विद्यार्थ्यांच्या शस्त्रक्रिया करायच्या आहेत त्यांना त्यामुळे निश्चितच लवकर लाभ मिळेल असे सांगितले.

## श्री मानकेश्वर वाचनालयात संत गाडगे महाराज जयंती साजरी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : थोर समाज सुधारक, आपल्या कृतीतून स्वच्छतेचे महत्त्व विशद करणारे संत गाडगे महाराज यांची माणकेश्वर वाचनालयात जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

श्री माणकेश्वर वाचनालयाचे संचालक सुहास सुरळीकर यांच्या हस्ते संत गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले.

याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार,चिटणीस प्रा. बाळासाहेब कापसे,संचालक सुनील चिखले, अशोक पगारे, मंगेश लगडे,वैष्णवी लगडे आरती जंगम आदी उपस्थित होते.

## स्वा. सावरकर विद्यालयात संत गाडगेबाबा जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील कोठुरे येथील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालयात संत गाडगेबाबा यांची जयंती व कर्मवीर ड. बाबुराव ठाकरे यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला.




या प्रसंगी संत गाडगेबाबा व बाबुराव ठाकरे यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक सातपुते एस एल होते. व्यासपीठावर शिक्षकवृंद उपस्थित होते. त्रिशा मोगल व प्रतिक्षा मोगल या विद्यार्थ्यांनीनी मनोगत व्यक्त केले.विद्यालयाच्या उपशिक्षक चिखले यांनी संत गाडगेबाबा यांच्या जीवनकार्याचा प्रभावी परिचय करून दिला.

आपल्या मनोगतात सांगितले की,संत गाडगेबाबा यांनी स्वच्छता,अंधश्रद्धा निर्मूलन आणि समाजप्रबोधन यासाठी आयुष्यभर कार्य केले. स्वच्छता हीच खरी सेवा' हा त्यांचा संदेश आजच्या पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. आपणही आपल्या परिसरात स्वच्छता राखून समाजसेवेचा आदर्श घ्यायला हवा. कर्मवीर बाबुराव ठाकरे यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल मनोगत व्यक्त केले. त्यांनी ग्रामीण भागातील शिक्षणविस्तारासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती देत,शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे हा त्यांचा विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवला. मुख्याध्यापक सातपुते एस एल यांनी अध्यक्षीय मनोगतातून संत गाडगेबाबा व कर्मवीर बाबुराव ठाकरे यांच्या कार्याचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपशिक्षक भडांगे के. आर. यांनी केले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

**कर्मवीर ॲड. बाबुराव ठाकरे पुण्यतिथी निमित्त अभिवादन**

## निफाड मोरे महाविद्यालयातील मानसशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी अनुभवला 'अंतर्मनाचा प्रवास'



**इगतपुरी येथील जगप्रसिद्ध धम्मगिरी विपश्यना आंतरराष्ट्रीय केंद्र आणि सहारा व्यसनमुक्ती – पुनर्वसन केंद्राला अभ्यास भेट**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य आणि विद्यान महाविद्यालयातील मानसशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी... इगतपुरी येथील जगप्रसिद्ध धम्मगिरी विपश्यना आंतरराष्ट्रीय केंद्रास भेट दिली. आशियातील सर्वात मोठ्या विपश्यना केंद्रापैकी एक असलेल्या भव्य पॅगोडाला भेट दिली असता केंद्राच्या स्वयंसेवकांनी विपश्येनेचा इतिहास आणि जगभरातील प्रसाराची माहिती दिली. 'वस्तुस्थिती आहे तशी पाहणे म्हणजे विपश्यना' हे तंत्र मानवी मानला कसे शुद्ध करते यावर येथील तज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी मौन पाळण्याचे तंत्र विद्यार्थ्यांना समजून सांगितले.

नाशिकरोड येथील प्रसिद्ध सहारा फौऊंडेशन नशा / व्यसनमुक्ती- पुनर्वसन केंद्र येथे विद्यार्थ्यांनी भेट दिली असता व्यसन हे चारित्र्याचा दोष नसून तो एक मेंदूचा आजार आहे. याची माहिती येथील तज्ञ समुपदेशकांनी दिली . त्यांनी व्यसनांची कारणे आणि उपाय यावर माहिती दिली. त्यांनी व्यसनमुक्तीची प्रक्रिया विद्यार्थांना सांगून काही व्यसनमुक्त होत असलेल्या व्यक्तींनी व्यसनमुक्तीचा प्रवास सांगितला. या शिवाय विद्यार्थ्यांनी इगतपुरी येथील कपिलधारा तीर्थ आणि परिसर, नाशिक येथील स्वामी नारायण मंदिर केंद्र आदि ठिकाणी भेट देऊन अध्यात्म आणि मानसिक आरोग्य याची अनुभूती घेतली. एकीकडे विपश्यानेतून मनाला शांत करण्याचे तंत्र नी दुसरीकडे व्यसनाधीन मनाला सावरण्याचे कार्य अश्या दोन्ही टोकाचा अभ्यास या क्षेत्रभेटी मुळे विद्यार्थ्यांना शक्य झाला.

प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. श्रीमती चित्रा कापसे यांनी अभ्यास दौऱ्याचे आयोजन केले होते.

**शाररीक आरोग्या एवढेच मानसिक आरोग्य महत्वाचे आहे. इगतपुरी येथील विपश्यना केंद्रात मनाची चंचलता कमी करून एकाग्रता कशी ठेवावी, ह्याचे ज्ञान विद्यार्थ्यांना व्हावे. सहारा नशा / व्यसनमुक्ती- पुनर्वसन केंद्र यांच्या भेटीतून विद्यार्थ्यांना व्यसनाचे दुष्परिणाम आणि व्यसनमुक्त जीवन कसे जगावे याचे प्रशिक्षण प्राप्त करण्यासाठी ह्या अभ्यास भेटीचे नियोजन करण्यात आले होते.**
**– प्रा. चित्रा कापसे, मानसशास्त्र विभागप्रमुख आणि समुपदेशक**

**मेरा बुद्रुक फाटा वस्तीवरील ग्रामस्थांची जिल्हाधिकारी यांना विनंती अर्जाद्वारे मागणी**

# पीएम स्वामित्व योजना राबवण्यासह नवीन वार्ड तयार करून बूथ द्या




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कैलास आंधळे / चिखली तालुका प्रतिनिधी : चिखली तालुक्यातील सर्वात जास्त लोकसंख्येचे गाव असलेले मेरा बुद्रुक येथील एक ते दीड किलोमीटर अंतरावरील असलेली मेरा बुद्रुक फाटा वस्तीवरील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी बुलढाणा यांना दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी दिलेल्या विनंती अर्जामध्ये त्यांनी नमूद केले की अनेक वर्षापासून कायमस्वरूपी राहत असून ७०० ते ८०० लोकसंख्या असलेल्या वाढीवस्तीमध्ये पीएम स्वामित्व योजनेचा लाभ मिळावा व येणाऱ्या सार्वत्रिक तसेच ग्रामपंचायतच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार यादी मध्ये मेरा बुद्रुक फाटा वाढीव वस्तीत स्पेशल बूथ देऊन नवीन वार्ड तयार करण्यात यावा अशी रास्त मागणी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी बुलढाणा यांना देण्यात आलेल्या विनंती अर्जात केली आहे या विनंती अर्जाच्या प्रतिलिपी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी बुलढाणा तसेच मा. तहसीलदार साहेब चिखली यांना सुद्धा देण्यात आले आहे.जिल्हाधिकारी बुलढाणा यांना देण्यात आलेल्या विनंती अर्जावर दोनशेहून अधिक ग्रामस्थांच्या सह्या आहे.

**मेरा बुद्रुक फाटा वस्तीवरील ग्रामस्थांनी मागणी केलेल्या पीएम स्वामित्व योजनेचे वैशिष्ट्ये**

पीएम स्वामित्व योजना ही केंद्र सरकारची ग्राम विकासासाठीची योजना असून याद्वारे ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर करून गावातील घरांचे आणि जमिनीचे सर्वेक्षण केले जाते व ग्रामस्थांना अधिकृत मालमत्ता कार्ड दिले जाते दिनांक २४ एप्रिल २०२० रोजी सुरू झालेल्या या योजनेचा उद्देश ग्रामीण भागातील जमिनीचे वाद मिटवणे आणि लोकांना त्यांच्या घराच्या मालकी हक्काची कागदपत्रे देणे असून ही योजना ग्रामीण भारताला स्वावलंबी बनवण्यासाठी आणि ग्रामस्थांना मालमत्तेचा हक्क मिळवून देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे समजते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंती निमित्त कळंबमध्ये चोख बंदोबस्त

## एकूण ५३ अधिकारी व कर्मचारी तैनात





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब : प्रतिनधी, सुधाकर रणदिवे, कुठलाही सण-उत्सव म्हटलं की पोलीस बंदोबस्त आलाच! सार्वजनिक कार्यक्रम म्हटलं की खाकी वर्दी हजरच यंदाच्या छत्रपती शिवाजी महार-ाज जयंती निमित्त कळंब शहरा-तही पोलीस प्रशासनाने आदर्श नियोजन करत कार्यक्रम सुरळीत पार पाडला.

डी.जे.च्या कर्कश आव-ाजाला बगल देत संस्कृती जपत पार पडलेल्या जयंती सोहळ्यात कुठलाही गालबोट लागू न देता नागरिकांना उत्सवाचा आनंद घेता यावा यासाठी पोलीस प्रशासन सज्ज होते. या कौतुका स्पद कामगिरीमुळे संपूर्ण शहराला शिवजयंतीचा आनंद सुरक्षित वाता वरणात घेता आला.

डी.वाय.एस.पी. संजय पवार साहेब, पी.आय. अजित चिंतले साहेब, ए.पी.आय. मगर साहेब, फुंडगे मॅडम,पी.एस.आय. पठाण साहेब, घाडगे साहेब, क्विक क्शन फोर्स विशेष व आणि स्थानिक गुन्हे शाखा जिल्हा विशेष शाखा हे पथक नेमण्यात आली होती, वाखाणण्याजोगे ठरले. शहरातील एक सामाजिक संघटना म्हणून जनतेच्या सुरक्षेसाठी २४ तास उभा असणाऱ्या या वेळी धाराशिव प्रेस क्लब शाखा कळंब यांच्या वतीने अल्प उपहार व पाणी बॉटल वाटप करण्यात आले, त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांची सोय करण्यात आली होती.

## सचिवांच्या आदेशानंतरही बहुजन कल्याण विभागाचा 'अजब' कारभार; रद्द शाळांच्या पुनर्मूल्यांकनाचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या राजे यशवंतराव होळकर इंग्रजी माध्यम निवासी शाळांबाबत बहुजन कल्याण विकास विभागात मोठा वाद निर्माण झाला आहे. सचिवांनी स्पष्ट आदेश देऊन संबंधित संस्थांची मान्यता नाकारली असतानाही संचालकांनी पुन्हा गुणवत्ता तपासणीचे आदेश दिल्याने प्रशासकीय पा-तळीवर खळबळ उडाली आहे.

राज्यातील २५ निवासी शाळांनी कागदोपत्री विद्यार्थ्यांची संख्या दाखवून कोट्यवधी रुपयांचा निधी लाटल्याचा ठपका ठेवत यापूर्वी त्यांची मान्यता रद्द करण्यात आली होती. त्यानंतर संस्थाचालकांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार संबंधितांना सुनावणी देण्याचे आदेश दिले होते.

न्यायालयाच्या आदेशानंतर बहुजन कल्याण विकास विभागाच्या सचिवांनी सर्व संस्थांची सविस्तर सुनावणी घेतली. या सुनावणीत संस्थाचालकांचा युक्तिवाद फेटाळण्यात आला आणि मागील निर्णय कायम ठेवत सर्व संस्थांची परवानगी नाकारण्यात आली.

सचिवांनी आदेशात नमूद केले होते की - - संस्थांनी चुकीची आकडेवारी सादर करून शासनाची दिशाभूल केली. - विद्यार्थ्यांना योजनेचा योग्य लाभ मिळाला नाही. - शासनाचे आर्थिक नुकसान झाले असून ते विनाविलंब वसूल करावे. - संबंधित संस्था आणि शाळांविरुद्ध कायदेशीर कारवाई करून अहवाल शास-नास सादर करावा. - संचालकांकडून पुनम ूल्यांकनाची हालचाल

सचिवांचे एवढे स्पष्ट आदेश असतानाही विभागाच्या संचालकांनी पुन्हा एकदा या शाळांचे गुणवत्ता मूल्यांकन करण्याचे आदेश दिल्याची माहिती समोर आली आहे. त्याम ुळे रद्द करण्यात आलेल्या शाळांना पुन्हा मान्यता देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचा आरोप केला जात आहे.

या निर्णयामागे राजकीय वरदहस्त असल्याचीही चर्चा रंगू लागली आहे. सचिवांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत घेतलेल्या या भूमिकेमुळे बहुजन कल्याण विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. दरम्यान, शासनाकडून याबाबत अधिकृत भूमिका स्पष्ट करण्यात येणार का, याकडे लक्ष लागले आहे.

## वसंत अंबाजी भांगे यांच्या स्मरणार्थ किरनळी येथील चंद्रादेवी यात्रेत महाप्रसादाचे वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट:/प्रतिनिधी :

सालाबाद प्रमाणे याही वर्षी कैलासवासी वसंत आंबाजी भांगे यांच्या स्मरणार्थ चंद्रादेवी यात्रेमध्ये देवीच्या दर्शनासाठी आलेल्या शेकडो भाविकांना महाप्रसादाचे वाटपाचे आयोजन करण्यात आले होते या स्तुत्य उपक्रमाचे उद्घाटन झी २४ तास या वृत्तवाहिनीचे मुख्य पत्रकार नितीन पाटणकर यांच्या हस्ते करण्यात आलं.. यावेळी यशसिद्धीचे संपादक कमलाकर सोनकांबळे पुण्याचे ज्येष्ठ कायदे तज्ञ अँड सचिन लंके, पत्रकार यशपाल सोनकांबळे चंद्रादेवीचे विश्वस्त अनिल भंडारे शरण आप्पा भंडारे यांच्यासह प्रफुल्ल भांगे , आरोग्यदूत विकी बाबा चौधरी, आयुष भांगे आराध्या भांगे यशवंत गायकवाड शाम बाबर महाद-ेव सोनकवडे यांची उपस्थिती होती..

## समाज कल्याण विभाग सहाय्यक आयुक्त दीपक मांटे यांचा अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : कठीण परिस्थितीतून यश मिळवत यशाला गवसणी घालून महाराष्ट्र लोकसेवा आयोग आयोगाच्या मार्फत ४ थ्या क्रमांकाने तब्बल दोन वेळा वर्ग १ पदी निवड झाली त्यामध्ये समाज कल्याण विभागामध्ये सहाय्यक आयुक्त तसेच इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभागामध्ये सहाय्यक संचालक या पदांवर निवड झालेल्या

मातृतीर्थ सिंदखेडराजा तालुक्यातील दरेगावचे सुपुत्र दिपक सु.मांटे यांचा दिनांक २३ फ ेब्रुवारी रोजी लोकसेवा नशामुक्ती व्यसन केंद्रामध्ये अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला ' यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला गावच्या सर्वांगीण विकासासाठी समाज कल्याण विभागामध्ये विविध प्रकारच्या योजनांची चर्चा केली. तसेच एक आदर्श गाव बनवण्यासाठी त्यांनी स्वतःच्या गावामध्ये लोकसहभागातून तसेच शासनाच्या विविध उपक्रमाच्या माध्यमातून दरेगाव या गावांमध्ये विविध उपक्रम त्यांनी राबवले. आज रोजी तालुक्यामध्ये एक आदर्श गाव म्हणून दरेगा-वचा नावलौकिक झालेला आहे. गावातील लोक जातीप-ातीचे राजकारण सोडून जेव्हा विकासासाठी एकत्र येते तेव्हा काय होऊ शकतं याचं दरेगाव येथील नागरिकांनी एक उदाहरण दिलेला आहे.

यावेळी त्यांनी लोकसेवा व्यसनमुक्ती केंद्र तर्फे राबवण्यात आलेल्या विविध उपक्रमाची माहिती घेतली आतापर्यंत लोकसेवा व्यसनम ुक्ती केंद्र मधून १००० पेक्षा जास्त तरुणांनी दारूचे व्यसन सोडले आहे '

त्यामुळे राधेश्याम बंगाळे पाटील त्यांचेही त्यांनी कौतुक केले

यावेळी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे विदर्भ उपाध्यक्ष प्रताप दादा मोरे यांच्या हस्ते समाज कल्याण सहाय्यक आयुक्त नागपूर दीपक माटें यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला .



यावेळी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन खंडारे , जिल्हा प्रसिद्धी प्रमुख समाधान सरकटे ' तालुका अध्यक्ष गणेश पंजरकर पत्रकार अहमद कुरेशी ' जुबेर शहा ' गणेश काळे ' पिंपळगावचे माजी उपसरपंच बंडू ठाकुर. नशामुक्ती व्यसन केंद्राचे संचालक राधेश्याम बंगाळे यावेळी उपस्थित होते.

## सारोळा मांडवा सेलू येथे गाडगेबाबा जयंती निमित्त परिसराची केली स्वच्छता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वाशी प्रतिनिधी/दिपक क्षिरसागर : वाशी तालुक्यातील सारोळा मांडवा येथील ग्राम म हसूल अधिकारी डी व्ही पाटील यांनी राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंती निमित्त आपले कार्यालय व परिसराची स्वच्छता करुन राष्ट्रसंत गाडगे बाबा यांचे विचार गावकऱ्यांना समजावून सांगितले. राष्ट्रसंत गाडगेबाबा नेहमी समाज स्वच्छतेचे, अंधश्रद्धा निर्मूलनाचे आणि निःस्वार्थ सेवाभावाचे प्रतीक असलेल्या संत गाडगे बाबा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी शिरसेवाड यांनी गाडगेबाबा यांच्या विषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले ते असे




म्हणाले कि, गाडगेबाबा यांचे मूळ नाव देबूजी झिंगराजी जानोरकर. त्यांनी आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण समाज जागृतीसाठी अर्पण केला. स्वच्छतेचा संदेश,

गाडगे बाबा जिथे जात तेथे प्रथम हातात झाडू घेऊन गाव स्वच्छ करत. देवळात जाण्यापूर्वी गाव स्वच्छ करा हा त्यांचा स्पष्ट संदेश होता. त्यांच्या मते खरी पूजा म्हणजे स्वच्छता, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव. त्यांनी लोकांना सांगितले की, देव दगडात नसून माणसाच्या सेवेत आहे. अंधश्रद्धेविरुद्ध लढा.

त्यांनी कीर्तनांच्या माध्यम ातून अंधश्रद्धा, जातिभेद, व्यसनाधीनता आणि दिखाऊ धर्माचार यावर प्रहार केला. साधी वस्त्र, फाटकी चादर, आणि खांद्यावर झोळी-यातूनच त्यांनी समाजाला म ोठा संदेश दिला की महानता वेशात नसून विचारात असते. शिक्षण व सेवा गाडगे बाबांनी

मिळालेल्या देणग्या स्वतः साठी कधीच वापरल्या नाहीत. त्या पैशातून त्यांनी धर्मशाळा, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे, गोशाळा आणि गरीबांसाठी निवारा उभारला. त्यांचा जीवनमंत्र होता-कमवा आणि समाजासाठी द्या.

आजच्या काळातील प्रेरणा आज स्वच्छ भारत सामाजिक समता आणि मानवतेचा विचार आपण करतो; पण गाडगे बाबांनी हे तत्त्व शंभर वर्षांपूर्वीच आ-चरणात आणले होते. त्यांचे जीवन आपल्याला शिकवते की परिवर्तन मोठ्या घोषणांनी नाही, तर छोट्या कृतींनी घडते.

संत गाडगे बाबा जयंतीनिमित्त आपणही एक संकल्प करूया-


स्वच्छता राखू, अंधश्रद्धा दूर करू आणि आपले गाव आ-पला परिसर स्वच्छ करून गाव-ातील वयोवृद्ध माणसाची काळजी घ्यावी, व शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व सम ाधान शिबिर मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ते, व इतर योज-नेची डी. व्ही. शिरसेवाड यांनी गावकऱ्यांना माहिती दिली. त्यामुळे या कर्मचाऱ्यांच्या निस्वार्थ भावनेमुळे गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महिलांची सर्वांगीण आरोग्य हीच खरी कुटुंबाची ताकद : डॉ. वर्षा डोईफोडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ जिल्हा रुग्णालय सोलापूर येथे रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांच्या आरोग्यासाठी सुरू करण्यात आलेल्या रोटरी आदिशक्ती क्लिनिकया विषयक उपक्रमाचा लोकार्पण सोहळा सोमवारी दिनांक २३ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता उत्साहात पार पडला या उपक्रम म ाननीय जिल्हा शल्य चिकित्सालय डॉक्टर वैशाळ डोईफोडे यांच्या संकल्पनेतून आणि रोटरी क्लबच्या सहकार्याने साकार झाला असून कार्यक्रम प्रांतपाल नियुक्त राजेश पटेल व डॉक्टर वर्षा डोईफोडे यांच्या हस्ते संपन्न झाला.

यावेळी मंचावर डॉक्टर आग्रजा वरेकर, डॉक्टर जयश्री ढवळे, अश्विनी रुरल, मेडिकल कॉलेजच्या अधिष्ठाता डॉक्टर माधवी रायते, सौ पारुल पटेल, राजेश पटेल, धनश्री केळकर निलेश फोपोलीया, संदीप झ** आदी मान्यवर उपस्थित होते तसेच डॉक्टर श्रीकांत कुलकर्णी, डॉक्टर चंद्रकांत क्षीरसागर, डॉक्टर रोहन वायचळ यांचेही उपस्थिती लाभले व कार्यक्रमास गौरीताई टिळक विद्यापीठ नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थिनी सुरवसे प्रशालेतील विद्यार्थिनी व अशा मोठ्या संख्येने उपस्थित होत्या यावेळी उपस्थित मान्यवरांचे झुबरियन अमेरिया, डॉक्टर राजीव प्रधान, शिव-



ाजी उपरे सुनील माहेश्वरी, निशांत डागा, नितेश पंचमी या संतोष कणेकर संजय मुडूर परा कुलकर्णी आशिष मेहता, शांत येळवेकर राजश्री चव्हाण लता चन्ना स्व-ाती मन सावली जानवी मुखिया, आसावरी सराफ कमाल जादू प्रांजल डागा सरिता खोपोलीया आधीची उपस्थिती होती.

महिलांच्या आरोग्यासाठी एका छताखाली सेवा आदिशक्ती पिकलेली अंतर्गत महिलांमध्ये आढळणारी कर्करोग हार्मोनियम राजनिवृत्ती उच्च रक्तदाब मधुमेह आदी आजारांचे निदान उपचार एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे किशोर अवस्थेपासून ते राजे निवृत्तीपर्यंत महिलांच्या शारीरिक मानसिक आणि हार्मोनल बदलांच्या विचार करून ही संकल्पना राबवण्यात येत आहे.

आपल्या मनोगत डॉक्टर वर्षा डोईफोडे म्हणाल्या घरातील स्त्री आरोग्य संपन्न असेल तर संपूर्ण कुटुंब सक्षम राहते महिलांची वेळेत निदान उपचार व्हावेत यासाठी पिक क्लिनिक महत्वाची भूमिका बजावल.

डॉक्टर माधवी रायते यांनी आपले मनोगत व्यक्त करताना पिंक हेल्थ सुदृढ आरोग्य बाबत मार्गदर्शन केले महिलांनी स्वतःचे आरोग्यासाठी कोणत्याही प्रकारचा संकोच न बाळगता स्वतः पुढाकार घ्यावा असे आव्हान देखील केले महाराष्ट्रातील महिला उपक्रम हा उपक्रम महाराष्ट्रात प्रथमच सोल-ापूर येथे सुरू करण्यात आला असून रोटरी जिल्हा ३१ ३२ अंतर्गत येणाऱ्या नांदेड संभाजीनगर अहिल्यानगर लातूर जालना बीड परभणी आधी ११ जिल्ह्या-तून स्थानिक रोटरी क्लबच्या सहकार्याने अशा प्रकारे केंद्र सुरू करण्यात येणार असल्याची माहिती प्रांतपाल नियुक्त राजेश पटेल यांनी दिली.

हा प्रकल्प पीपी पटेल फाउंडेशन यांच्या सीएसआर निधीतून साकारण्यात आला आहे महिलांना आव्हान सचक्त नारी सशक्त भारत या ब्रीदवाक्य अनुसार महिलांनी या अभियाना उपक्रम ाच्या अधिकाधिक लाभ घ्यावा असे आव्हान जिल्हा रुग्णालय सोलापूर व रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांच्या वतीने करण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर ऐश्वर्या सातपुते यांनी केले.

**कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जयंतीनिमित्त कार्यक्रम**

## संत गाडगे महाराजांच्या कार्यातून आदर्श घेऊन नागरिकांनी शहर विकासात योगदान द्यावे : सोमशेखर स्वामी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : संत गाडगे महार-ाज यांनी रस्ते, मंदिरे आणि विहिरी स्वच्छ करून स्वच्छतेचा आदर्श घा-लून दिला, त्यामुळे समाजाने त्यांच्या सर्वंकष कार्यापासून आदर्श घेऊन शहर स्वच्छता व विकासामध्ये योगदान द्यावे असे प्रतिपादन अक्कलकोट नगरपालिका शिक्षण मंडळ, प्रशासनाधिकारी सोम शंकर स्वामी यांनी केले.

मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, पर्यवेक्षक सूर्यकांत रूगे, समुपद-ेशक सिद्धू विटकर उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की,

जातीभेद निषेधार्थ आहे असे सांगून महाराजांनी मानवतेचा संदेश दिला लोकांना श्रमाचे महत्त्व पटवून दिले काम करा, प्रगती करा हा संदेश दिला. स्वच्छ भारत संकल्पना त्यांच्या विचारातूनच साकारण्यात आली. त्यांनी निस्वार्थ सेवा करा अशी शिकवण दिली. म्हणून त्यांचा आदर्श घेतला पाहिजे.




कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले आभार कार्यक्रमाधिकारी प्राध्यापिका डॉ शितल झिंगाडे भस्मे यांनी मानले कार्यक्रमास शितल फुटाणे, हर्षदा गायकवाड, सौरभ भस्मे, ऐश्वर्या तारा-पुरे, भीम सोनकांबळे आदी उपस्थित होते.

### गाडगे महाराज विज्ञानवादी संत

**समाजातील रूढी परंपरा अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी संत गाडगे महाराजांनी आयुष्यभर प्रयत्न केले त्यामुळे ते खऱ्या अर्थाने विज्ञानवादी संत होते असे प्रतिपादन अभिवादन कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे जेष्ठ संचालक म ल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.**

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा भविष्यकाळाचा विचार करुन व्यापक स्वरुपात करावा : ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे

## मंदिर विकासाबाबत सविस्तर आढावा घेऊन दिल्या सूचना



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखड्याचे नियोजन हे येत्या तीस-चाळीस वर्षातील वाढीव लोकसंख्या आणि बदलत्या काळाच्या पार्श्वभूमीवर भविष्यकाळाचा विचार करुन व्यापक स्वरुपात करण्याच्या सूचना ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांनी येथे दिल्या.

मंत्रालयात आयोजित श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा व जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत मंत्री जयकुमार गोरे यांनी संबंधितांना सूचित केले. बैठकीस आमदार समाधान औताडे,सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद तसेच संबंधित यंत्रणाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. खासदार प्रणिती शिंदे दूरदृष्यप्रणालीद्वारे बैठकीत सहभागी होत्या.

विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसराचा विकास करताना पुढील तीस चाळीस वर्षांत शहराचा होणारा विस्तार, लोकसंख्या वाढ,वाहनांची वाढती संख्या, मंदिरास भेट देणा-या भाविकांची, देशा-परदेशातून येणा-या पर्यटकांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन नियोजन करावे. पाण्याची व्यवस्था, रस्त्यांची लांबी रुंदी, वारी काळात होणाऱ्या गर्दीचे व्यवस्थापन, मंदिर परिसर विकासाचे नियोजन , कामाचा दर्जा या सर्व बाबी या येत्या भविष्याचा विचार करुन दर्जदार व व्यापक स्वरुपात कराव्यात.

मंदिर विकासाबाबत सविस्तर आढावा घेऊन ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांनी संबंधितांना सूचना दिल्या.

# पंढरपूर संतभूमीचे आमदार आवताडे तिसऱ्यांदा तालिका अध्यक्षपदी विराजमान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात झाली असून विधानसभा अध्यक्ष ड. नार्वेकर यांनी विधानसभेचे कामकाज सुरळीत चालावे, यासाठी तालिका अध्यक्षांची नियुक्ती जाहीर केली, यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांना तालिका अध्यक्षपदावर तिसऱ्यांदा संधी मिळाली आहे तालिका अध्यक्षपदावर काम करण्याची संधी मिळाल्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर संतभूमीचा शिलेदार अधिवेशनात विधानसभा अध्यक्षांच्या गैरहजेरीत तालिका अध्यक्ष म्हणून कामकाज पाहणार आहेत या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये सोलापूर जिल्ह्याला वेगळं काय मिळते का याकडे अनेकांचे लक्ष लागले असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

त्याचबरोबर राजू खरे योगेश सागर संजय केळकर दिलीप लांडे चंद्रकांत नवघरे सुनील प्रभू अमित झनक यांचीही तालिका अध्यक्ष म्हणून निवडी झाले आहेत.

आमदार समाधान आवताडे यांची सलग तीन अधिवेशनामध्ये तालिका अध्यक्ष म्हणून निवड झाली आहे.

पोट निवडणुकीत निवडून आल्यानंतर पहिल्यांदा आमदार समाधान आवताडे यांची तालिका अध्यक्षपदी निवड झाली होती त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये पुन्हा विजय मिळवल्यानंतर भाजपने तालिका अध्यक्ष करत मोठी संधी दिली होती त्या संधीचं सोनं करत आमदार समाधान आवताडे यांनी तालिका अध्यक्ष पदावर उत्कृष्ट काम करून वरिष्ठांची शाबासकी मिळवली होती नव्या जुन्यांना सोबत घेत प्रत्येकाला बोलण्याला वेळ देत वेगवेगळ्या विषयांचे प्रश्न समजून घेत त्यांनी प्रत्येकाच्या प्रश्नाला न्याय देण्याचा प्रयत्न केला होता त्यामुळे त्यांच्या कामाची वाहवा झाली होती नव्हते असतानाही आमदार समाधान आवताडे यांनी उत्कृष्टपणे सभागृह हाताळत अनेक प्रश्नांची सोडवणूक केली होती त्यामुळे त्यांच्या कामाच्या जोरावर यंदाही त्यांची तिसऱ्यांदा निवड करून पक्षाने त्यांच्यावर विश्वास दाखविला आहे. विधानसभेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष गैरहजर असतील त्यावेळेस विधानसभेच्या सभापती पदाची धुरा तालिका अध्यक्षांना संभाळावी लागते आमदार समाधान आवताडे यांनी त्यांच्या कार्य काळामध्ये मोठ्या प्रमाणावर मतदारसंघांमध्ये निधी खेचून आणला आहे अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावले आहेत राज्यभर त्यांच्या कामाचा गवगवा होत असून पक्षाने कामसू माणसाला पुन्हा एकदा तालिका सभागृहात पाठवून त्यांच्या कामाची दखलच घेतली असल्याचे बोलले जात असून पुन्हा एकदा आपल्या कामाची चुणूक दाखवण्याची संधी मिळणार आहे.

# माळशेज घाटाच्या पायथ्याशी शिवस्मारक उभारण्याची मागणी; पंतप्रधान व मुख्यमंत्र्यांकडे पत्रव्यवहार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अरबी समुद्रातील प्रस्तावित स्मरकाऐवजी ते स्मारक माळशेज घाटाच्या पायथ्याशी, सावरणे गावाजवळ उभारण्यात यावे, अशी मागणी मुरबाड तालुक्यातील करचोंडे गावचे सामाजिक कार्यकर्ते रमेश घरत यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्रव्यवहाराद्वारे सविस्तर निवेदन पाठवले आहे. तर अरबी समुद्रातील स्मारकाचा पुनर्विचार करून ते सह्याद्रीच्या सान्निध्यात उभारावे. माळशेज घाटाच्या पायथ्याशी सावरणे परिसरात स्मारक उभारल्यास ऐतिहासिक आणि भौगोलिक सुसंगती साधली जाईल.

ग्रामीण व आदिवासी भागाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल. पर्यटनवृद्धीमुळे स्थानिक युवकांना रोजगारनिर्मितीची संधी उपलब्ध होईल. पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य व शिक्षण क्षेत्रात सुधारणा होईल. शासनाने तज्ज्ञ समितीमार्फत व्यवहार्यता अहवाल तयार करून सकारात्मक निर्णय घ्यावा. असे रमेश घरत यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, शिवरायांचे कार्य सह्याद्री पर्वतरांगांशी घट्ट जोडलेले असून त्यांच्या स्मारकाचे स्थानही त्या ऐतिहासिक भूमीत असणे अधिक प्रेरणादायी ठरेल. यामागणीमुळे शिवस्मारकाच्या स्थानाबाबत नव्याने चर्चा सुरू झाली असून शासनाची भूमिका काय राहते, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# मुदत संपली तरी 'पावर' कायम; ग्राम पंचायतींबाबत राज्य सरकारचा मोठा निर्णय




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील ग्रामपंचायतींच्या कारभाराबाबत राज्य सरकारने एक ऐतिहासिक आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. ज्या ग्रामपंचायतींची मुदत २८ फेब्रुवारी रोजी संपत आहे, तिथे आता बाहेरचा सरकारी प्रशासक न नेमण्याऐवजी विद्यमान सरपंचांकडेच गावचा गाडा सोपवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे निवडणुका लांबणीवर पडल्या तरी विकासकामांचा खोळंबा होणार नाही.

काय आहे नवा निर्णय?

सामान्यतः ग्रामपंचायतीची पाच वर्षांची मुदत संपल्यानंतर तिथे विस्तार अधिकारी किंवा तहसीलदार स्तरावरील सरकारी प्रशासकाची नियुक्ती केली जाते. मात्र, नवीन निर्णयानुसार:

सरपंचच होणार प्रशासक: मुदत संपण्याच्या दिवशी जे सरपंच पदावर असतील, त्यांनाच तात्पुरते 'प्रशासक' म्हणून काम पाहण्याची संधी मिळेल.

प्रशासकीय समिती: केवळ सरपंचच नव्हे, तर त्यांच्या सोबतीला उपसरपंच आणि इतर सदस्यांची एक विशेष प्रशासकीय समिती कार्यरत राहील.

कामात सुसूत्रता: नवीन सरकारी व्यक्तीला गावची भौगोलिक आणि सामाजिक परिस्थिती समजून घेण्यास वेळ लागतो, तो वेळ वाचवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

न्यायालयीन लढ्याला यश

या निर्णयामागे अकोल्यातील हिंगणी बुद्रुक गावच्या सरपंच डॉ. कल्पना पळसपगार यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल केलेल्या याचिकेचा मोठा वाटा आहे. या याचिकेवरील सुनावणीदरम्यान सरकारने आपली भूमिका स्पष्ट करत स्थानिक लोकप्रतिनिधींवर पुन्हा विश्वास दर्शवला आहे.

सरकारच्या निर्णयाचे महत्त्व

एकाच वेळी राज्यातील अनेक ग्राम पंचायतींची मुदत संपत असल्याने प्रत्येक ठिकाणी स्वतंत्र सरकारी अधिकारी नेमणे व्यवहार्य नव्हते.

स्थानिक पदाधिकाऱ्यांकडेच कारभार राहिल्यामुळे: गावातील दैनंदिन कामे आणि सुरू असलेले विकास प्रकल्प विनाअडथळा सुरू राहतील. प्रशासकीय कामात सुसूत्रता येईल.

गावातील स्थानिक प्रश्नांची जाण असलेल्या व्यक्तींकडेच निर्णयक्षमता राहील. थोडक्यात सांगायचे तर: आता गावचा विकास 'बाहेरच्या' हातांत जाण्याऐवजी 'गावच्या' लेकरांच्याच हातात राहणार आहे. यामुळे ग्रामीण राजकारणात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई यांच्याकडून जि. प. सदस्य आदिनाथ देशमुख, प. स. राहुल पूर्वत यांचा सन्मान







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्यामध्ये नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये करकम गटातून जिल्हा परिषदेला निवडून आलेली सदस्य श्री आदिनाथ नरहरी देशमुख, पंचायत समिती सदस्य श्री राहुल पूर्वत यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने श्री राजेंद्र कोरके पाटील पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष यांच्या शुभहस्ते यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष, रोहन नरसाळे, तालुका कार्याध्यक्ष राजेंद्र करपे, तालुका सचिव लक्ष्मण शिंदे, गणेश माने, मार्केट कमिटीचे संचालक विजय जाधव, ग्रामपंचायत सदस्य महेंद्र शिंदे, व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या कै.कल्याणराव इंगळे सभामंडपात संपन्न झाला लोकार्पण सोहळा**

**पोलीस कर्तव्य आणि स्वामी भक्तीचा संगम : नगरसेवक महेश इंगळे**

# नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, मंदीर समितीचे चेअरमन, नगरसेवक महेश इंगळे यांच्या हस्ते 'स्वामी हो' या भक्तीगीत ध्वनीमुद्रणे संचचे लोकार्पण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : श्री स्वामी समर्थांची अनेक भक्तीगीते आजपर्यंत बाहेरील कलाकारांनी गायलेली आहेत. यंदा अक्कलकोटच्या भूमिपुत्राने स्वतः स्वामींचे गायलेले भक्तीगीतांना स्वामी भक्तांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभत आहे.

ही बाब सोलापूर जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच घडल्याने हा विषय अक्कलकोट करांसाठी व आम्हा देवस्थान विश्वस्त पदाधिकाऱ्यांसाठी विशेष अभिमानाचा क्षण असल्याचे प्रतिपादन येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक महेश इंगळे यांनी केले. आज नवी मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेले अक्कलकोटचे सुपूत्र रोहित राठोड यांनी गायलेल्या 'स्वामी हो' या भक्तीगीतांचा ध्वनीमुद्रणे संच लोकार्पण सोहळा येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरातील कै.कल्याणराव इंगळे सभामंडपात भारतीय जनता पार्टीचे नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, मंदीर समितीचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे, उपनगराध्यक्ष ऋतुराज बंटी राठोड, प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते मोठ्या भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी महेश इंगळे बोलत होते. कार्यक्रमाच्या व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून मा. निशिकांत सदाफुले, मा.नेहरिका सदाफुले, योगेश राठोड, मा.नेताजी भाऊ खंडागळे, मा.भीमराव विश्वनाथ राठोड, मा.रमेश राठोड, मा.खेमु राठोड आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी सर्व मान्यवरांचा मंदीर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांनी श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद देवून यथोचित सत्कार केला. यावेळी बोलताना नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांनी पोलीस सेवेतील जबाबदाऱ्या सांभाळत स्वामी भक्ती जोपासून साकारलेले हे भक्तीगीत सर्वत्र कौतुकास पात्र ठरत आहे.श्री स्वामी समर्थ यांच्या पावन भूमीत सादर झालेल्या या गीताने उपस्थित भक्तांना आध्यात्मिक अनुभूती दिली. आजपर्यंत स्वामींची अनेक भक्तीगीते बाहेरील कलाकारांनी गायलेली असताना, अक्कलकोटच्या भूमिपुत्राने स्वतः स्वामींचे भक्तीगीत गायले हा बाब आपणांसह अक्कलकोट वासियांसाठी व मंदीर समितीसाठी अभिमानास्पद बाब असल्याचे सांगून गायक रोहित राठोड यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी मंदीर समितीचे चेअरमन नगरसेवक महेश इंगळे यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कलेचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, नगरसेवक नन्नू कोरबू, तम्मा शेळके, शिवू स्वामी, बाळा शिंदे, मनोज इंगुले, अंकूश केत, सुनिल पवार, प्रा.शिवशरण अचलेर, बाळासाहेब एकबोटे, श्रीशैल गवंडी, व्यंकटेश पुजारी, श्रीकांत मलवे, गिरीश पवार, शिवाजी गुजर, विपूल जाधव आदींसह राठोड, चव्हाण, पवार परिवार व मित्रमंडळ व स्वामी भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> **श्री स्वामी समर्थांच्या आशीर्वादाने ही सेवा साकारली आहे.हे गीत मी स्वामी चरणी अर्पण केले असून पुढेही भक्तांसाठी अशीच भक्तीगीते सादर करत राहीन**
> **– गायक, तथा पोलीस सेवक रोहित राठोड, नवी मुंबई**